एम एम आर डी ए
MMRDA

# जाहीर सूचना

१. स्वामी समर्थ नगर - जोगेश्वरी -विक्रोळी या मेट्रो -६ च्या उन्नत मार्गिकेस शासन निर्णय क्र.एमआरडी- ३३१६ /प्र.क्र.१४०/नवि-७, दि.२१/१२/२०१७ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

२. सदर मेट्रो -६ उन्नत मार्गिकेमुळे बाधित होणा-या बांधकामाचे पायाभूत सामाजिक, आर्थिक सर्व्हेक्षण करण्यात आले असून, सदरचा सर्व्हेक्षण अहवाल सह महानगर आयुक्त, पहिला माळा, एम.एम.आर.डी.ए., नविन इमारत, बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा (पू), मुंबई - ४०० ०५१ यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

३. सदर मेट्रो -६ उन्नत मार्गिकेमुळे बाधित होणा-या संतोषी माता नगर, सुभाष नगर, श्याम नगर, दुर्गा नगर येथील प्रकल्पबाधितांच्या पात्र/अपात्रते बाबतची प्रारुप यादी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सूचना फलकावर तसेच https://mmrda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीच्या / निर्णयाच्या अनुषंगाने कोणाची काही हरकत असल्यास त्याबाबतचा अर्ज सह महानगर आयुक्त यांच्याकडे त्यांचे कार्यालय पहिला माळा, एम.एम.आर.डी.ए., नविन इमारत, बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा (पू), मुंबई - ४०० ०५१ येथे ७ दिवसांच्या आत सादर करावा.

दिनांक -०८/०१/२०२०
ठिकाण - मुंबई

सही /-
(डॉ. बी.जी. पवार)
सह महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण